## NEWS PAPER CLIPPING
## MET's Institute of .Pharmacy
## (Department of library)

Date: - 4|11|2016

Day:- Friday

Name of News Paper Lokmat

Page no. 

Name of Supplement Hello Nashik

Page no. of Supplement 06

---

# भुजबळ नॉलेज सिटीकडून शाळेसाठी मुलींचे स्वच्छतागृह

**नाशिक :** मेटस इन्स्टियूट ऑफ फार्मसी मधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून सामाजिक कल्याण कक्ष स्थापन केला आहे.

समाजोपयोगी विविध प्रकल्पांमध्ये सर्व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी वेळोवेळी आर्थिक साहाय्य करतात. यामध्ये सर्व शिक्षक दरमहा आपापल्या वेतनातून एक ठरावीक नाममात्र रक्कम जमा करतात व यातून जमा झालेल्या रकमेचा उपयोग एखाद्या सामाजिक आणि शैक्षिणक कामामध्ये केला जातो. या संकल्पनेतून इगतपुरी तालुक्यातील वैतरणानगर येथील वैतरणा इंग्लिश मीडियम स्कूल येथे मुलींसाठी स्वच्छतागृहे बांधून देण्यात आली. मुलींची गैरसोय दूर करण्यासाठी मेट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थ्यांच्या पुढाकाराने चार स्वच्छतागृहे बांधून देण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर तंत्रनिकेतनचे संचालक विजय भट, व्यवस्थापन महाविद्यालयाचे अधीक्षक डॉ. हर्षवर्धन गोखले यांच्या उपस्थितीत महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींच्या हस्ते लोकार्पण करण्यात आले. यावेळी शेफाली भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले. (वा.प्र.)



भुजबळ नॉलेज सिटी-मेट इन्स्टिट्यूटच्या विद्यार्थिनीकडून वैतरणा इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये स्वच्छतागृहांचे लोकार्पण करण्यात आले. याप्रसंगी उपस्थित प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर, तंत्रनिकेतनचे संचालक विजय भट व शिक्षक, कर्मचारी.

MET's Institute of Pharmacy LIBRARY Nasik

NEWS PAPER CLIPPING
MET/BKC/IOP
(Department of library)

Date: - 05/01/2016

Day:-

Name of News Paper : Lokmat.
Page no. _

Name of Supplement : Hello-Nashik.
Page no. of Supplement : 06

# मेट भुजबळ नॉलेज सिटीत सावित्रीबाई फुले यांना अभिवादन



नाशिक : येथील मेट भुजबळ नॉलेज सिटीत स्त्री शिक्षणाच्या आद्यप्रवर्तक व समाजसुधारक सावित्रीबाई फुले यांची १८५वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

भुजबळ नॉलेज सिटीतील निशिगंधा निकम व प्रमिला निंबेकर या महिला सेविकांच्या हस्ते सावित्रीबाई फुले व जोतिराव फुले यांच्या अर्धाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करण्यात आला. या प्रसंगी सर्व इन्स्टिट्यूचे प्राचार्य, विभागप्रमुख व रजिस्टार तसेच ट्रस्ट ऑफिस, स्टाफ कर्मचारी उपस्थित होते.कार्यक्रम प्रसंगी सावित्रीबाईंच्या कार्याचा आढावा घेण्यात आला.(वा.प्र.)

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
Nasik

# NEWS PAPER CLIPPING
## MET/BKC/IOP
## (Department of library)

Date: - 30/12/2015

Day:- Wednesday.

Name of News Paper : Lokmat
Page no. —

Name of Supplement : Hello Nashik.
Page no. of Supplement : 06

# नागोसली येथे श्रमसंस्कार शिबिर




**नाशिक :** मेट, भुजबळ नॉलेज सिटी इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर आणि इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रीय सेवा योजनेअंतर्गत विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन (दि. २८) ते ३ जानेवारीदरम्यान नागोसली, ता. इगतपुरी येथे करण्यात आले आहे.

शिबिराच्या उद्घाटन समारंभास गावच्या सरपंच अनुसयाबाई होले, उपसरपंच बाळासाहेब शिंदे, विविध कार्यकारी सोसायटी चेअरमन दत्तू शिंदे, पोलीसपाटील पुंडलिक ताठे, ग्रामपंचायत सदस्य सुनीता शिंदे, गजाबाई शिंदे, दत्तू गिरे, पंढरी होले, मार्कंडे, सुमन गाडेकर, तसेच अभियांत्रिकीचे प्राचार्य डॉ. व्ही.पी. वाणी, कार्यक्रम अधिकारी किशोर चोबे उपस्थित होते.

अध्यक्षस्थानी बोलताना प्रा.डॉ. एच. व्ही. गोखले यांनी सामाजिक बांधिलकी या विषयावर व्याख्यान दिले. तसेच गावकऱ्यांच्या समस्या, गावच्या विकासयोजनांवर प्राचार्य डॉ. व्ही.पी. वाणी यांनी चर्चा केली.

सूत्रसंचलन प्रा. अमोल वरंदळ यांनी केले तसेच प्रा. सुशील पाटील यांनी आभार मानले. या कार्यक्रमास मेट बीकेसीच्या मुख्य प्रशासक शेफाली भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले. या कार्यक्रमास मेट बीकेसीचा स्टाफ व विद्यार्थी हजर होते.

MET's Institute of Pharmacy LIBRARY ★ Nasik ★

# NEWS PAPER CLIPPING
## MET/BKC/IOP
## (Department of library)

Date: - 27/09/2013

Day:- Friday

Name of News Paper : Divya-marathi
Page no. –

Name of Supplement : Divya-city
Page no. of Supplement : - 07

# 'मेट'मध्ये फार्मासिस्ट डे



'मेट'मध्ये फार्मसी दिनानिमित्त औषधी वनस्पतींचे वृक्षारोपण करताना विद्यार्थी. समवेत संस्थेच्या शेफाली भुजबळ यांच्यासह मान्यवर.

प्रतिनिधी | नाशिक

'मेट' भुजबळ नॉलेज सिटी, इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीमध्ये 'फार्मासिस्ट डे' साजरा करण्यात आला.

त्यात पोस्टर प्रेझेंटेशन, सेमिनार, वनस्पतींचे वृक्षारोपण आदी कार्यक्रम झाले. अन्न आणि औषध प्रशासनाचे माजी सहआयुक्त सुहास चौधरी यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. मल्टीडिसीझ ड्रग्ज, योग्य निदान, कायदेशीर बाबी आणि फार्मसीतील करिअर याविषयी मार्गदर्शन केले. मेट, बीकेसीच्या मुख्य प्रशासक शेफाली भुजबळ यांनी लाइफस्टाइल, आजार आणि आयुर्वेद तसेच मानसिक संतुलनाबद्दल चर्चा केली.

## विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये आशिष, दीपक यांचे यश

भुजबळ नॉलेज सिटी येथे आयोजित विविध तांत्रिक स्पर्धांमध्ये सपकाळ अभियांत्रिकीतील तृतीय वर्ष इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशनचे विद्यार्थी आशिष छाबरा व दीपक अमृतकर यांनी यश मिळवले. आशिषने मेटियराइट-१३ कार्यक्रमातील मॅक-मॅटलॅब स्पर्धेत प्रथम, जिग्सॉ फिजिक्स आणि ॲप्टिट्यूडमध्ये द्वितीय अशी तीन पारितोषिके; तर दीपकने मेटियराइट-१३ कार्यक्रमात रोबोकिक स्पर्धेत प्रथम, तर रोबोरेस स्पर्धेत द्वितीय स्थान मिळवले. या व्यतिरिक्त मेटेक-१३ मधील रोबोवारमध्ये प्रथम, तर स्पार्क्स-१३ मधील बुद्धिबळ स्पर्धेत द्वितीय बक्षीस मिळवले. संस्थेचे संस्थापक रवींद्र सपकाळ यांनी यशस्वितांचे अभिनंदन केले.

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
27-9-13
Nasik

**NEWS PAPER CLIPPING**
**MET/BKC/IOP**
**(Department of library)**

**Date:** - 5/10/2015 **Day:**- Monday.

**Name of News Paper** : Divya Marathi **Name of Supplement** : Divya city.
**Page no.** — **Page no. of Supplement** : 05

---

# भुजबळ नॉलेज सिटीत 'फार्मासिस्ट डे'

## शहरातील फार्मासिस्ट्सना विद्यार्थ्यांनी दिले शुभेच्छापत्र

प्रतिनिधी | नाशिक

जागतिक औषधनिर्माणशास्त्र दिनानिमित्त भुजबळ नॉलेज सिटीमधील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात 'फार्मासिस्ट डे' उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी आयोजित केलेल्या विविध उपक्रमांची उपस्थितांना माहिती देण्यात आली. यानिमित्त विद्यार्थ्यांनी शहरातील फार्मासिस्ट्सना भेटून त्यांना शुभेच्छापत्र देऊन त्यांचा गौरव केला.

या महाविद्यालयाच्या औषध आणि आरोग्य माहिती केंद्रातर्फे चांदवड येथील लोढा फार्मसी महाविद्यालयाचे प्रा. अविनाश भुतडा यांचे 'औषधाचा सुरक्षित व तर्कशुद्ध पद्धतीने वापर व जेनेरिक औषधे' या विषयावर माहितीपूर्ण व्याख्यान झाले. या कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांनी शहरातील फार्मासिस्ट्सना भेटून त्यांना शुभेच्छापत्र देऊन गौरव केला. या उपक्रमाला चांगला प्रतिसाद लाभला. कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त समीर भुजबळ, मुख्य प्रशासक शेफाली भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
Nasik

**NEWS PAPER CLIPPING**
**MET/BKC/IOP**
**(Department of library)**

Date: - 30/09/2015 Day:- Wednesday.

Name of News Paper : Divya-marathi Name of Supplement : Divya-city.

...nt : 02

**उपक्रम** | मेट भुजबळ नॉलेज सिटीत 'फार्मासिस्ट डे'निमित्त मार्गदर्शन

# औषधनिर्माता आपल्या आरोग्याचा भागीदारच



भुजबळ नॉलेज सिटीमध्ये आयोजित 'औषधांचा सुरक्षित व तर्कशुद्ध पद्धतीने वापर व जेनेरिक औषधे' व्याख्यानास उपस्थित शिक्षक व विद्यार्थी.

## फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. क्षीरसागर यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | नाशिक



औषधनिर्मात्याचे आपल्या आयुष्यात अनन्यसाधारण स्थान असते. 'फार्मासिस्ट यूवर पार्टनर इन हेल्थ' म्हणजेच फार्मासिस्ट आपल्या आरोग्याचा भागीदारच असतो, असे प्रतिपादन फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी केले.

जागतिक औषधनिर्मातादिनाचे औचित्य साधत मेट भुजबळ नॉलेज सिटीमधील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात 'फार्मासिस्ट डे' साजरा करण्यात आला. या उपक्रमांतर्गत औषध आणि आरोग्य माहिती केंद्राच्या वतीने 'औषधांचा सुरक्षित व तर्कशुद्ध पद्धतीने वापर व जेनेरिक औषधे' या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. त्याप्रसंगी डॉ. क्षीरसागर बोलत होते. फार्मसी व्यावसायिकांचे विविध पैलू व सध्याच्या काळात फार्मसी व्यावसायिकांसमोर असणारी आव्हाने विचार मांडले. यानंतर चांदवड येथील लोढा फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अविनाश भुतडा यांनी मार्गदर्शन करताना भारत सरकारद्वारे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि उपक्रमांची माहिती उपस्थितांना सांगितली. तसेच, स्वीकार केला जात आहे, याची त्यांनी अनेक उदाहरणेदेखील दिली. कार्यक्रमास संस्थेचे विश्वस्त समीर भुजबळ व मुख्य प्रशासक शेफाली भुजबळ यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी सर्व विभागांतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी



### फार्मासिस्टना विद्यार्थ्यांनी दिल्या शुभेच्छा

'फार्मसिस्ट डे'निमित्त महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी शहरातील अनेक फार्मासिस्टना शुभेच्छापत्र व फुले देऊन त्यांच्याप्रति आदर व्यक्त केला. नेहमीच आरोग्यसेवा व औषध वितरणात व्यस्त असणाऱ्या फार्मासिस्टसाठी हा एक वेगळा अनुभव ठरला. या उपक्रमातही विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला.

MET's Institute ... LIBRARY

**NEWS PAPER CLIPPING**
**MET/BKC/IOP**
**(Department of library)**

Date: - 24/07/2016 Day:- Sunday.

Name of News Paper : Lokmat
Page no. —

Name of Supplement : Hello-Nashik
Page no. of Supplement : 06

# औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात रावसाहेब कसबे यांचे व्याख्यान

नाशिक : स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय बहाल करणाऱ्या संविधानाचा सन्मान करा, असा सल्ला ज्येष्ठ विचारवंत डॉ. रावसाहेब कसबे यांनी आपल्या व्याख्यानात दिला.

मुंबई एज्युकेशन ट्रस्ट, संचलित औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात सोशल वेल्फेअर शाखेतर्फे 'सामाजिक बांधिलकी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे भारतीय संविधानातील योगदान' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते.

डॉ. कसबे यांनी स्वातंत्र्यपूर्व भारतातील समाजव्यवस्थेचे अनेक दाखले देऊन संविधानाने भारतीय जनतेला दिलेल्या स्वातंत्र्य, समता, बंधुता, एकात्मता, न्याय यासारख्या पैलूंचे महत्त्व विशद केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी प्रस्तावना सादर केली. त्यानंतर तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भट यांनी डॉ. कसबे यांचा सत्कार केला. (वाणिज्य प्रतिनिधी)



प्रा. डॉ.रावसाहेब कसबे यांचा सत्कार करताना औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर व समवेत तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विजय भट.

LIBRARY

# NEWS PAPER CLIPPING

## MET's Institute of B.Pharm.

## (Department of library)

Date: - 22/10/2016

Day:- Saturday.

Name of News Paper : Pudhari

Page no.: 09

Name of Supplement —

Page no. of Supplement —

---

## 'मेट' फार्मसीत व्याख्यान

**नाशिक : प्रतिनिधी**

मेट, भुजबळ नॉलेज सिटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे विद्यार्थिनींसाठी व्याख्यान घेण्यात आले. 'कायदे महिलांसाठी' या विषयावर ॲड. विजया माहेश्वरी यांनी मार्गदर्शन केले. डॉ. अमिता कर्णिक यांनी 'इच्छाशक्ती व ध्येयपूर्ती प्रबळ करणे' या विषयावर माहिती दिली. त्या म्हणाल्या की, विद्यार्थिनींनी जीवनात अगोदर ध्येय निश्चित करण्याची गरज आहे. जिद्द, चिकाटी व इच्छाशक्ती प्रबळ करून येणाऱ्या दैनंदिन समस्यांवर मात करून ध्येयाकडे वाटचाल करावी, असे आवाहन केले. प्रा. नीलम दशपुत्रे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. नीलिमा ठोंबरे व डॉ. सपना अहिरराव यांनी परिश्रम घेतले. प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले.

MET's Institute of Pharmacy ★ Nasik ★ LIBRARY

# NEWS PAPER CLIPPING

## MET's Institute of B.Pharm.

## (Department of library)

Date: - 26/10/2016

Day:- Wednesday.

Name of News Paper : Lokmat.

Page no. —

Name of Supplement : Hello-Nashik.

Page no. of Supplement : 06

# 'मेट' विद्यार्थिनींना विशेष मार्गदर्शन



**नाशिक :** इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी नाशिकतर्फे मेट, भुजबळ सिटीत आयोजित अॅड. विजया माहेश्वरी- कायदे महिलांसाठी आणि डॉ. अमिता कर्णिक- इच्छाशक्ती व ध्येयपूर्ती प्रबळ करणे या विषयावरील व्याख्यानास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

कायद्याची विद्यार्थिनींना माहिती असावी या उद्देशाने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.

महिला सबलीकरण, महिला सक्षमीकरण याविषयी तसेच प्रतिबंधक कायदा, मुलींचे व कुटुंबाचे हिंसाचारापासून संरक्षण याबाबत अॅड. विजया माहेश्वरी यांनी मार्गदर्शन केले.विद्यार्थिनींनी जीवनात आधी ध्येय निश्चित करायला हवे. जिद्द, चिकाटी व इच्छाशक्ती प्रबळ करून येणाऱ्या दैनंदिन समस्यांवर मात करून ध्येयाकडे वाटचाल करावी, असे प्रतिपादन डॉ. अमिता कर्णिक यांनी केले. डॉ. नीलिमा ठोंबरे, डॉ. सपना, प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनीही मार्गदर्शन केले. सूत्रसंचालन नीलम दशपुत्रे यांनी केले. (वा. प्र.)

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
★ Nasik ★

**NEWS PAPER CLIPPING**
**MET's Institute of Pharmacy**
**(Department of library)**

Date:- 07/06/2017

Day : Friday.

Name of News Paper : Lokmat.
Page No. _

Name of Supplement : Hello Nashik
Page No. of Supplement : 06

# मेट्स, भुजबळ नॉलेज सिटीतर्फे वनमहोत्सव




**नाशिक :** भुजबळ नॉलेज सिटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे 'वन महोत्सव-२०१७' मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात आला. या महोत्सवप्रसंगी राष्ट्रीय स्वयंसेवेचे कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनी सुमारे १०० रोपे लावली.

या महोत्सवानिमित्त फार्मसीच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येकी दोन झाडे दत्तक घेऊन रोपांची लागवड, संगोपन करणे आणि त्या रोपांच्या वाढीसाठीची काळजी घेण्याची जबाबदारी उचलली. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर, कार्यक्रमाचे समन्वयक प्रोफे. प्रताप पवार, एनएसएस समन्वयक डॉ. पवन उदावंत आदी यावेळी उपस्थित होते.

MET's Institute of Pharmacy LIBRARY ★ Nasik ★

NEWS PAPER CLIPPING
MET's Institute of Pharmacy
(Department of Library)

Date: - 28/01/2017

Day:- Saturday.

Name of News Paper : Lokmat.

Page no. —

Name of Supplement : Hello-Nashik

Page no. of Supplement : 07

# मेटमध्ये निर्भय कन्या अभियान योजना शिबिर



नाशिक : भुजबळ नॉलेज सिटी, मेट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या संयुक्त विद्यमाने 'निर्भय कन्या अभियान' योजनेमार्फत विविध शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते.

डॉ. गौरी करंदीकर यांनी 'पॉलिसिस्टीक ओव्हरी सिंड्रोम' या विषयावर विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. तसेच मोहमद आरिफ खान यांनी विद्यार्थिनींना स्वसंरक्षणाचे धडे दिले. आदर्श महिला व विकास मार्गदर्शन संस्थेच्या ॲड. विजयमाला जोशी यांनी विद्यार्थिनींना महिला सबलीकरण व महिला हक्क याबद्दल माहिती दिली.

या शिबिरासाठी प्राचार्य डॉ. क्षीरसागर यांचे मार्गदर्शन लाभले. सूत्रसंचालन डॉ. नीलिमा ठोंबरे व प्रोफे. निलम दशपुत्रे यांनी केले. (वा.प्र.)

MET's Institute of Pharmacy LIBRARY ★ Nasik ★

# NEWS PAPER CLIPPING
## MET's Institute of D.Pharm.
## (Department of library)

**Date:** - 6/11/2016 **Day:**- Sunday.

**Name of News Paper** : Divya - Marathi **Name of Supplement** : Divya-city.
**Page no.** — **Page no. of Supplement** : 02



मंथन | भुजबळ नॉलेज सिटी संचालित फार्मसी कॉलेजमध्ये कार्यशाळा

# जिद्द व चिकाटीच्या जोरावर ध्येय गाठावे

### ॲड. विजया माहेश्वरी यांचे विद्यार्थिनींना आवाहन

प्रतिनिधी | नाशिक





प्रमुख मान्यवर ॲड. विजया माहेश्वरी आणि डॉ. अमिता कर्णिक यांचा सत्कार करताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर.

महिलांनी नोकरी व व्यवसाय करताना जिद्द व चिकाटीने सातत्यपूर्ण प्रयत्न करायला हवे. सकारात्मक दृष्टिकोन व प्रबळ इच्छाशक्तीच्या बळावर ध्येय गाठणे शक्य होईल. तसेच, महिलांनी सबलीकरणाबरोबरच स्वसंरक्षणाकडेही लक्ष दिले पाहिजे, असे आवाहन ॲड. विजया माहेश्वरी यांनी केले.

आडगाव परिसरातील भुजबळ नॉलेज सिटी संचलित इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी कॉलेजतर्फे विद्यार्थिनींसाठी नुकतीच 'महिलांविषयक कायदे' या विषयावर कार्यशाळा घेण्यात आली. यावेळी ॲड. माहेश्वरी बोलत होत्या. याप्रसंगी डॉ. अमिता कर्णिक, प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर, प्रा. नीलम दशपुत्रे, डॉ. नीलिमा ठोंबरे व डॉ. सपना अहिरराव उपस्थित होते. यावेळी महिलांचे सबलीकरण, महिलांचे सक्षमीकरण करण्यासाठी सरकारच्या योजना आदींची माहिती देण्यात आली. तसेच, महिलांच्या संरक्षणासाठी असलेल्या कायद्यांची माहितीही देण्यात आली. विद्यार्थिनींनी जीवनात आधी ध्येय निश्चित करायला हवे व यासाठी जिद्द, चिकाटी व इच्छाशक्ती प्रबळ करून येणाऱ्या समस्यांवर मात करून ध्येयाकडे वाटचाल करण्याचे आवाहन डॉ. कर्णिक यांनी केले.

MET's Institute of Pharmacy LIBRARY Nasik

# NEWS PAPER CLIPPING
## MET's Institute of Pharmacy
## (Department of library)

**Date:** - 16/10/2017

Day : Monday.

Name of News Paper : Lokmat
Name of Supplement Hello - Nashik

Page No. —
Page No. of Supplement - 03

# मेट्सतर्फे महिला स्टाफसाठी कर्करोग तपासणी उपक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क



नाशिक : मेट्स, भुजबळ नॉलेज सिटी येथे छगन भुजबळ, समीर भुजबळ यांच्या वाढदिवसानिमित्त संस्थेत मेट सेवा व स्पंदन ग्रुपच्या अंतर्गत महिलांसाठी हेल्थ चेकअप व त्याबद्दलची माहिती देण्यासाठी नामको हॉस्पिटल येथील प्रसिद्ध डॉ. श्रद्धा वाळवेकर यांच्या सेमिनारचे आयोजन करण्यात आले होते.

या सेमिनारद्वारे त्यांनी महिलांना होणाऱ्या ब्रेस्ट कॅन्सर व गर्भाशयाचा कॅन्सर याबद्दल माहिती दिली. वयपरत्वे स्त्रियांमध्ये होणारे हार्मोनल बदल व त्यामुळे कधी कधी अनेक व्याधी वा आजार डोके वर काढत असतात. त्यामुळे स्वत:ची काळजी कशी घ्यावी हे अतिशय सोपे करून सांगितले. त्याप्रमाणे वेगवेगळ्या प्रकारचे कर्करोग व याबद्दलची माहिती दिली.

डॉ. सुचिता शिंदे आणि टीम यांनी महिलांसाठी 'पम्प सिमर टेस्ट' व इतर तपासणी शिबिर आयोजित केले. या शिबिरामध्ये संस्थेतील सुमारे ५० महिलांनी सहभाग नोंदविला. (वा.प्र.)

MET's Institute of Pharmacy LIBRARY Nasik

# NEWS PAPER CLIPPING
## MET's Institute of Pharmacy
## (Department of library)

Date:- 11 July, 2017

Day:- Tuesday

Name of News Paper maharashtra times

Page no. –

Name of Supplement "Nashik Plus"

Page no. of Supplement 04

टॉक टाइम

# मूल्याधिष्ठीत शिक्षणावर भर



**शहरात फार्मसी कॉलेजेसची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे. विद्यार्थ्यांचाही या क्षेत्राकडे सध्या मोठा कल दिसून येत आहे. राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवर उपलब्ध होत असलेल्या संधींमुळे हे क्षेत्र विद्यार्थ्यांना खुणावत आहे. या स्पर्धेत मूल्याधिष्ठीत शिक्षणावर भर देणे गरजेचे असल्याचे मत एमईटीज इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी मांडले. याविषयी तसेच एमईटी फार्मसी कॉलेजविषयी अधिक जाणून घेण्यासाठी त्यांच्याशी साधलेला संवाद.**

- **शहरात फार्मसी कॉलेजची संख्या मोठी आहे यात तुमच्या कॉलेजचे वैशिष्ट्य काय?**

- २००६ साली आमच्या कॉलेजची स्थापना झाली. केवळ शैक्षणिकदृष्ट्या नाही तर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आमच्या कॉलेजमध्ये सुरुवातीपासून प्रयत्न केले जातात. विद्यार्थी शिक्षणातील तांत्रिक गोष्टींतील निपुणतेबरोबरच सामाजिक, नैतिक मूल्य जोपासणारा असावा, या उद्देशाने कॉलेज प्रशासन प्रयत्नशील असते. याशिवाय, शिक्षणासाठी तसेच त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक सर्व सुविधा आम्ही कॉलेजमध्ये उपलब्ध करुन दिल्या आहेत.

- **कॉलेजमध्ये कोणकोणते अभ्यासक्रम शिकवले जातात?**

- डी. फार्मसी, बी. फार्मसी, एम. फार्मसी, पीएचडी सेंटर असे सर्व प्रकारचे अभ्यासक्रम विद्यार्थ्यांना कॉलेजनी उपलब्ध करून दिले आहेत. कॉलेजमधील ६० टक्के प्राध्यापकवर्ग पीएचडीधारक आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या सखोल ज्ञानाचा लाभ होत असतो. शिवाय, विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठीही पूरक वातावरण मिळत असते. तसेच विविध स्कील डेव्हलपमेंट प्रोग्राम, सर्टिफिकेट कोर्सेसही घेतले जातात.

- **विद्यार्थ्यांसाठी फार्मसी क्षेत्रातील संधी कोणत्या?**

- औषधांची गरज मानवाला नेहमीच भासणारी आहे. त्यामुळे या क्षेत्राचा विस्तार हा कायमस्वरूपी होतच राहणार आहे. परिणामी, या क्षेत्रआतील डिग्री मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांनाही भविष्यात भरपूर संधी उपलब्ध आहेत. हॉस्पिटल्स, व्यवसाय, मोठमोठ्या कंपन्या, संशोधन सेंटरमध्ये संधी आहेत. जागतिक स्तरावर औषधांमधील विविध संशोधने होत असून औषधे तयार करण्यापासून इनोव्हेशनपर्यंत विद्यार्थी काम करु शकतात. तसेच अनेक फार्मा कंपन्यांचा विस्तारही मोठ्या प्रमाणात होत आहे.

- **या क्षेत्रासमोरील आव्हाने कोणती?**

- फार्मसी क्षेत्रात होत असलेल्या तंत्रज्ञानाच्या विकासाबाबत विद्यार्थ्यांनी अपडेट राहणे गरजेचे आहे. औषधनिर्माण शास्त्र कंपन्या, उद्योजक यांनीही कॉलेजशी समन्वय ठेवणे आवश्यक आहे. असे केल्याने विद्यार्थ्यांसमोरील नोकरीचे आव्हान जाऊन त्यांना संधी मिळू शकतील. शिवाय, उद्योजकांना असलेल्या मनुष्यबळाची निकडही दूर होऊ शकेल.

- **विद्यार्थीविकासासाठी कॉलेजमध्ये राबविले जाणारे उपक्रम कोणते?**

- प्रत्येक वर्षी वेगवेगळे विद्यार्थी कॉलेजमध्ये प्रवेश घेत असतात. या विद्यार्थ्यांमध्ये चार वर्षांनंतर काय काय गुणवत्ता असली पाहिजे, यादृष्टीने विचार करुन आम्ही उपक्रम राबवतो. या क्षेत्राबाबत विद्यार्थी अपडेट रहावे, यासाठी सेमिनार, वर्कशॉप घेतले जातात. विशेष म्हणजे कॉलेजमध्ये अंडर ग्रॅज्युएट विद्यार्थ्यांसाठी रिसर्च, इनोव्हेशनची आवड निर्माण व्हावी, यासाठी कॉन्फरन्सही घेतली जाते. ही राज्यस्तरीय कॉन्फरन्स असते. या वर्षीपासून राष्ट्रपातळीवर घेण्यात येणार आहे. यातील विजेत्यांना रोख बक्षिसे, प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येते. तसेच विद्यार्थ्यांचे गाईड व कॉलेजला सहकार्याबद्दल गौरविण्यात येते. सोशल वेल्फेअर सेलअंतर्गत सामाजिक क्षेत्रातील लोकांची व्याख्याने ठेवली जातात. दरवर्षी कॉलेजचा स्टाफ मिळून आदिवासी भागातील शाळांना मदत करतो. वैतरणा येथे मुलींसाठी स्वच्छतागृह बांधून देण्यासारखी कामे याअंतर्गत केली जातात. विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकी निर्माण व्हावी यासाठी त्यांनाही या उपक्रमांमध्ये सहभागी करून घेतले जाते. याशिवाय मेट उत्सव नावाचा वार्षिक सोहळा असतो. विद्यार्थ्यांना सर्व प्रकारच्या कलागुणांचे सादरीकरण करण्याची संधई यातून मिळते. तसेच एनएसएसद्वारे अनेक उपक्रम राबवले जातात.

- **गेल्या काही वर्षांत कॉलेजला मिळालेली अचिव्हमेंट?**

- २०१३-१४ मध्ये जी-पॅट परीक्षेत ऑल इंडिया रँकिंगमध्ये आमच्या कॉलेजचा विद्यार्थी पहिला आला आहे. ६० टक्के प्राध्यापकवर्गाने पीएचडीधारक आहे. पाच ते सहा कंपन्यांबरोबर समन्वय करण्यात यश मिळवले असून त्याचा लाभ विद्यार्थ्यांना होतो.

- **विद्यार्थ्यांना काय संदेश देऊ इच्छिता?**

- फार्मसी क्षेत्रात इनोव्हेशनसाठी, रिसर्चसाठी, विकासासाठी वाव आहे. उद्योजक बनण्यासाठीदेखील संधी उपलब्ध आहेत. लोकांशी निगडीत असणारे हे क्षेत्र आहे तसेच यात सामाजिक कामही करता येऊ शकते. ज्या विद्यार्थ्यांना या क्षेत्रात खरेच आवड आहे त्यांनी नक्कीच या क्षेत्राचा विचार करावा.

शब्दांकन : अश्विनी कावळे

MET's Institute of Pharmacy ★ Nasik ★ LIBRARY 13/07/17

**NEWS PAPER CLIPPING**
**MET's Institute of Pharmacy**
**(Department of library)**

Date: - 8/7/2017

Day:- saturday.

Name of News Paper : Divya- marathi
Page no.

Name of Supplement : Divya-city.
Page no. of Supplement : 02

# वृक्षारोपणाचा ध्यास, पर्यावरण संवर्धनाची साद

पर्यावरण संवर्धनाच्या ध्यासातून शहरातील विविध शाळा, महाविद्यालयांसह संस्था, संघटनांकडून ठिकठिकाणी वृक्षारोपण करण्यात आले. तसेच या झाडांचे संरक्षण करण्याविषयी नागरिकांत प्रबोधनही करण्यात आले.



## मेटमध्ये वनमहोत्सव

भुजबळ नॉलेज सिटीच्या इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीतर्फे वनमहोत्सवांतर्गत राष्ट्रीय स्वयंसेवकचे कार्यकर्ते व विद्यार्थ्यांनी मिळून विविध प्रकारच्या १०० रोपांची लागवड केली. फार्मसीच्या द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी प्रत्येकी २ झाडे दत्तक घेतले. इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर, कार्यक्रमाचे समन्वयक प्रा. प्रताप पवार आणि एनएसएस समन्वयक डॉ. पवन उदावंत यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

MET's Institute of Pharmacy LIBRARY Nasik

# NEWS PAPER CLIPPING
## MET's Institute of Pharmacy
## (Department of library)

Date: - 7/9/2017

Name of News Paper : Lokmat
Page no. –

Day:- Thursday.

Name of Supplement : Hello Nashik.
Page no. of Supplement : 06

---

### 'मेट'च्या परिसंवादात स्वातंत्र्य लढ्यातील आठवणी



नाशिक : मेट्स भुजबळ नॉलेज सिटी येथील औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालयात एक परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. ३१ रोजी आयोजित कार्यक्रमामध्ये वसंत हुदलीकर यांनी स्वातंत्र्य लढ्यातील अनेक आठवणींना उजाळा दिला. विद्यार्थ्यांना संबोधित करताना त्यांनी स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय व ते कसे मिळाले आणि भारत स्वतंत्र होऊन ७० वर्षांनंतरही काही रुढी व परंपरा कशा बाधक आहेत हे समजावून सांगितले. वयाच्या ९३ व्या वर्षीसुद्धा अतिशय उत्साहीपणे हुदलीकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व मुक्त संवाद साधला. कार्यक्रमाचे आयोजन प्रा. सुशील पाटील, डॉ. पवन उदावंत, प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी मार्गदर्शन केले.

MET's Institute of Pharmacy ★ Nasik ★ LIBRARY

NEWS PAPER CLIPPING
MET's Institute of Pharmacy
(Department of Library)

Date:- 01/02/2017

Day:- Wednesday.

Name of News Paper : Lokmat-times
Page no.

Name of Supplement : Nashik-first
Page no. of Supplement : 04

# VARIOUS CAMPS AT BKC UNDER 'NIRBHAYA KANYA ABHIYAN'



Principal Dr Sanjay Kshirsagar welcoming Dr Gauri Karandikar at the camp in BKC.

Bhujbal Knowledge City, MET Institute of Pharmacy and Savitribai Phule Pune University organised various camps at BKC under 'Nirbhaya Kanya Abhiyan' recently. Dr Gauri Karandikar guided students on 'Polycystic Ovarian Syndrome'. Mohammed Arif Khan guided about self defence. Adarsha Mahila Vikas Margadarshan organisation's Vijaymala Joshi talked about women empowerment.

The camps were organised under theguidance of principal Dr Sanjay Kshirsagar. Dr Nilima Thombre and Neelam Dashputre anchored the event.

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
Nasik

NEWS PAPER CLIPPING
MET's Institute of Pharmacy
(Department of Library)

Date:- 03/03/2017.                                   Day:- Friday.

Name of News Paper : Divya Marathi                   Name of Supplement : Divya city
Page no.                                             Page no. of Supplement : 01

# महिलांनी निर्भय होणे गरजेचे : देशपांडे



मेटमध्ये 'महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१३'च्या जागृती कार्यशाळेत मार्गदर्शन करताना आसावरी देशपांडे.

**प्रतिनिधी | नाशिक**

मेट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी येथे कामाच्या ठिकाणी महिलांचा लैंगिक छळ (प्रतिबंध, मनाई व निवारण) कायदा २०१३ च्या अंमलबजावणी बाबत जाणीव -जागृती वाढविण्यासाठी एक दिवसीय कार्यशाळा घेण्यात आली. प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांनी या कार्यशाळेच्या प्रमुख वक्त्या आसावरी देशपांडे यांचे स्वागत केले.

देशपांडे यांनी कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरोधातील कायद्याबद्दलची सविस्तर माहिती महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना निरनिराळ्या घडलेल्या घटनांना अनुसरून दिली. त्याचबरोबर त्यांनी अंतर्गत महिला तक्रार निवारण प्रक्रियेबाबतही चर्चा केली. लैंगिक छळाच्या प्रकरणांमध्ये मदतीसाठी महिलांना सहजरीत्या सहभागात्मक दृष्टिकोन ठेवून घटनेची चर्चा करावी, असेही देशपांडे यांनी यावेळी सांगितले.

कायद्यानुसार तक्रार दाखल केल्यास ९० दिवसांत त्याचे निरसन करणे आवश्यक आहे, असे ही त्यांनी कार्यशाळेत नमूद केले. कार्यशाळा यशस्वीरीत्या पार पडण्यासाठी डॉ. नीलिमा ठोंबरे, आय.सी.सी. अध्यक्षा प्रा. नीलम दशपुत्रे, आय.सी.सी. सदस्या वर्षा माने यांनी सूत्रसंचालन केले.

MET's Institute of Pharmacy ★ Nasik ★ LIBRARY

**NEWS PAPER CLIPPING**
**MET's Institute of Pharmacy**
**(Department of library)**

Date: - 9/02/2018 Day : Friday.

Name of News Paper : Lokmat. Page No. —
Name of Supplement Hello - Nashik Page No. of Supplement 06

## 'मेट'च्या शिबिरात विविध उपक्रम



नाशिक : सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ व मेट्स इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी भुजबळ नॉलेज सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने ओढा येथे आयोजित महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचा समारोप ग्रामपंचायतीचे सरपंच विष्णू पेखळे यांच्या अध्यक्षतेखाली झाला. याप्रसंगी गावाचे सरपंच मधुकरराव पेखळे, उपसरपंच मनीषा चोरडिया अरुण पेखळे, ग्रामपंचायत सदस्य तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर, महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. पवन उदावंत, प्रा. प्रताप पवार, प्रा.डॉ. राणी कानकाटे, प्रा. स्मिता रुपवते, विकास वामने आदी उपस्थित होते. स्वच्छ व स्वस्थ भारत अभियान हा संकल्प हाती घेऊन राबविलेल्या या शिबिरातून महाविद्यालयाच्या स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. शिबिरादरम्यान आपत्ती व्यवस्थापन कार्यशाळा व घरगुती गॅस वापरासंबंधी सुरक्षा उपाय, महिलांची आरोग्य तपासणी, गावातील महिला व मुलांची थॅलेसेमिया, सिकलसेल अनेमिया, हिमोग्लोबीन व रक्तगट तपासणी, तरुणांसाठी उद्योजकता विकास मार्गदर्शन, जेनेरिक औषधांविषयी व्याख्यान व समस्यांचे निराकरण, रक्तदान मोहीम इत्यादी उपक्रम राबविले गेले.

MET's Institute of Pharmacy LIBRARY Nasik

NEWS PAPER CLIPPING
MET's Institute of Pharmacy
(Department of library)

Date: - 5/03/2018

Day : Monday.

Name of News Paper : Sakal
Name of Supplement : Sakal - yuva

Page No. -
Page No. of Supplement : 07

# स्वसंरक्षणाचे धडे

**महाविद्यालयीन मुलींनी स्वत:चे संरक्षण स्वतः करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मार्क मार्शल आर्टसचे संस्थापक अध्यक्ष मोहंमद आरिफ खान यांनी केले. एमईटी भुजबळ नॉलेज सिटी (आडगाव) येथे फार्मसी विभागात स्वसंरक्षणाचे धडे या विषयावर झालेल्या कार्यशाळेत ते बोलत होते. या वेळी संस्थेच्या संचालिका शेफाली भुजबळ, प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर,**
**प्रा. वैशाली रावल, प्रा. जय उगले आदी उपस्थित होते.**



सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ, निर्भय कन्या अभियानांतर्गत संरक्षण प्रशिक्षण एकदिवसीय कार्यशाळा मेट इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी नाशिक यांच्याकडून झाली. या वेळी प्रथम सत्रात जिल्हा युवा समन्वयक भगवान गवई, दुसऱ्या सत्रात मार्क मार्शल आर्टसचे संस्थापक व कार्यकारी व्यवस्थापक मोहंमद आरिफ खान यांनी दैनंदिन जीवनात अतिप्रसंगाच्या वेळी घेण्याची काळजी, चाकू, लाठी व गुंड प्रवृत्तीच्या लोकांपासून स्वतःचा बचाव कसा करायचा याची विद्यार्थिनींना प्रात्यक्षिके दाखवत प्रशिक्षण दिले.

कार्यक्रमाचे आयोजन प्रा. वैशाली रावल, प्रा. जय उगले यांनी केले. पायल वारे, तेजस्विनी बोथरा यांनी सूत्रसंचालन केले. यशस्वितेसाठी मार्क मार्शल आर्टसच्या सचिव, सानिया खान, विद्या कांबळे, अमित मारडी, प्रमोद कांबळे, गोफकुमार, निधी प्रवीणकुमार, अदिबा खान यांनी सहकार्य केले.

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
Nasik

NEWS PAPER CLIPPING
MET's Institute of Pharmacy
(Department of library)

Date: - 5/3/2018

Day : Monday.

Name of News Paper : Divya-marathi
Name of Supplement : Divya-city

Page No. –
Page No. of Supplement : 02

# भुजबळ नॉलेज सिटीत मुलींना स्व-संरक्षणाचे धडे

प्रतिनिधी | नाशिक

महाविद्यालयीन मुलींनी स्वतःचे संरक्षण स्वतः करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन मार्क मार्शल आर्टसचे संस्थापक अध्यक्ष मोहम्मद आरिफ खान यांनी केले. ते एमईटी भुजबळ नॉलेज सिटी आडगाव येथे फार्मसी विभागात स्व-संरक्षण धडे या विषयावर आयोजित कार्यशाळेत बोलत होते. संस्थेच्या संचालिका शेफाली भुजबळ, प्राचार्य डॉ.संजय क्षीरसागर, प्रा. वैशाली रावल, प्रा. जय उगले आदी उपस्थित होते.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ, निर्भय कन्या अभियानांतर्गत संरक्षण प्रशिक्षण कार्यशाळा आयोजित करण्यात आले होती. जिल्हा युवा समन्वयक भगवान गवई, मोहम्मद आरिफ खान यांनी बचाव कसा करायचा त्याचे प्रशिक्षण दिले. आयोजन प्रा. वैशाली रावल, प्रा. जय उगले यांनी तर सूत्रसंचालन पायल वारे, तेजस्विनी बोथरा यांनी केले. सानिया खान, विद्या कांबळे ,अमित मारडी, प्रमोद कांबळे, गोफकुमार, निधी प्रवीणकुमार, अदीबा खान यांनी परिश्रम घेतले.

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
★ Nasik ★

**NEWS PAPER CLIPPING**
**MET's Institute of Pharmacy**
**(Department of library)**

Date: - 13/11/2017

Day : Monday.

Name of News Paper : Pudhari
Name of Supplement —

Page No. 07
Page No. of Supplement —



## 'मेट'मध्ये राष्ट्रीय एकता दिन साजरा

**नाशिक :** मेट भुजबळ नॉलेज सिटी येथील औषधनिमार्णशास्त्र महाविद्यालयात नुकताच परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, विद्यार्थी विकास मंडळ आणि राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमात प्रा. अविनाश भुतडा यांनी स्वातंत्र्यसैनिकांच्या कार्याविषयी माहिती दिली. प्रा. भुतडा यांनी स्वातंत्र्य म्हणजे नेमके काय व ते कसे मिळाले आणि सरदार वल्लभभाई पटेल व स्व. इंदिरा गांधी यांचे कार्य समजावून सांगितले. आजच्या तरुणांसामोरील आव्हाने व त्यांची सामाजिक बांधिलकी यांची जाणीव करून देताना प्रा. भुतडा यांनी संत गाडगेबाबा, संत कबीर, संत नामदेव यांची धर्मनिरपेक्षता व मानवजातीचे एकतेचे महत्त्व त्यांनी विशद केले. कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास मंडळ अधिकारी प्रा. सुशील पाटील व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. पवन उदावंत, प्रा. रोहन अहिरे यांनी केले. तसेच डॉ. दीपक भांबेरे यांनी आभार मानले व त्यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय क्षीरसागर यांचे मार्गदर्शन मिळाले.

MET's Institute of Pharmacy
LIBRARY
Nasik

NEWS PAPER CLIPPING
MET's Institute of Pharmacy
(Department of library)

Day : Thursday.

Date: - 11-01-2018

Page No. —
Page No. of Supplement - 05

Name of News Paper : Divya-Marathi
Name of Supplement : Divya-City



ओढा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिरांतर्गत स्वच्छता करताना विद्यार्थी.

# मेट-बीकेसीतर्फे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे उद्घाटन

**नाशिक** | मेट्स भुजबळ नॉलेज सिटीतील इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसी व सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने स्वास्थ्य अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजनेच्या हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन नुकतेच ओढा येथे सरपंच विष्णू पेखळे व मधुकर पेखळे यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी मनीषा चोरडिया, पोलिसपाटील गजानन भोर, साहेबराव पेखळे, तंटामुक्ती अध्यक्ष बबनराव कंक, अरुण पेखळे, मुक्ताबाई पेखळे यांसह ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी फार्मसीचे विभागप्रमुख डॉ. दिनेश ऋषिपाठक यांनी उपस्थितांसह शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. हे शिबीर शनिवारी (दि. १३)पर्यंत चालणार असून, डॉ. पवन उदावंत हे शिबिराचे समन्वयक आहेत.

Institute of Pharmacy LIBRARY MET's Nasik




**Journey to Camp Place Odha**




**Inauguration of Camp**



**Seminar on Social Responsibility**



**Lunch Break**



**Zilha Parishad School Ground (Before)**



**Zilha Parishad School Ground (After)**



**Disaster Management Workshop by Mr. Mohd. Arif khan**




**Seminar of LPG Safety by Mr. Jagdish Pekhle**



**Disaster Management Workshop**



**Disaster Management Workshop**




**Seminar on Womens Health by Dr Shraddha sonanis**



**Consultation by Dr. Shraddha Sonanis**



**Cleanliness Drive at Zilha Parishad school**



**(After) Cleanliness Drive at Zilha Parishad school**






**Cleanliness and repair of streets**



**(After) Cleanliness and repair of streets**



**Cleanliness and repair of streets**



**(After) Cleanliness and repair of streets**



**Cleanliness of Market place**



**(After) Cleanliness of Market place**



**Cleanliness of Veterinary Clinic**



**(After) Cleanliness of Veterinary Clinic**




**Seminar on Entrepreneurship Development by dr. Shahaji Deshmukh**




**Seminar on Generic Medicines by Prof. Vaibhav buchake**



**Celebration of Yuwa Din**




Blood Donation Camp




**Organ Donation Awareness Rally**



**Organ Donation Awareness Rally**




**Organ Donation Awareness Rally**



**Unveiling of Sanitary Napkin Vending Machine**




Thalassemia Check up camp at Health center






Valedictory Function



Valedictory Function

**NSS REGULAR ACTIVITIES**






**BLOOD DONATION CAMPS**




**ORGAN DONATION AWARENESS RALLY**



**TREE PLANTATION**




**Yoga Day Celebration**

**LORD GANESHA IDOL COLLECTION**




**2016-17**




2015-16



2014-15



2013-14



2013-14

**NSS WINTER SPECIAL CAMP AT VINCHUR GAVLI VILLAGE AY- 2016-17**





## FARM ANIMAL HEALTH CHECK UP CAMP



**CLEANLINESS DRIVE IN A SCHOOL**



**TREE PLANTATION DURING WINTER CAMP**

**NSS WINTER SPECIAL CAMP AT NAGOSALI VILLAGE AY- 2015-16**













**NSS WINTER SPECIAL CAMP AT GAULANE VILLAGE AY- 2014-15**





**DAM CONSTRUCTION FOR WATER CONSERVATION**
















**Hemoglobin and Thallessemia checkup camp during NSS Camp**





Computer Literacy

## NSS WINTER CAMP AT NAGOSALI AY 2013-14




Motivation by Hon. Bhishmaraj Bam



Cleanliness Drive






Guidance to the Villagers for Health and Hyegine




**GUEST LECTURE BY HON. RAOSAHEB KASABE**




**SWC CONSULTANAT HON. UTTAMJI KAMBLE**



**INAUGURATION OF TOILET CONSTRUCTED FOR TRIBAL GIRLS SCHOOL**






**DISTRIBUTION OF UNIFORMS TO TRIBAL KIDS**






**SWC VISIT TO A TRIBAL SCHOOL**



**Cycle Distribution**